रामाचे परतणे

रामाचे परतणे

मराठी : अश्विनी बर्वे

बाहेर थंडी होती. हिवाळ्यातली थंड वारं वाहत होतं. घरात उबदार आणि आरामदायक होतं. जया आणि तिची आई दिपा दिव्यांचा सण, दिवाळीची तयारी करत होती.

“वडील घरी कधी येणार?” जयाने विचारलं.

“बाळा, तुला धीर ठेवायला हवा,” आई म्हणाली. “अयोध्येच्या लोकांसारखा. तुला माहीत आहे का? अयोध्येतील लोकांनी किती वर्षे राम परतण्याची वाट पाहिली होती?”

“किती वर्ष?”

“चवदा वर्ष.”

“हा तर खूप काळ आहे.”

“तर, जोपर्यंत आपण वाट पहात आहोत, तोपर्यंत मी तुला ही कहाणी सांगते.”



.....रामाच्या दुष्ट, सावत्र आईने राजकुमार राम आणि त्याची सुंदर पत्नी सीता यांना वनात राहण्यासाठी पाठवलं होतं.

दहा तोंडं असणाऱ्या राक्षस रावणाने जेव्हा सीतेला बघितलं तेव्हा त्यांचा मनात इर्षा जागी झाली. सीता आपली पत्नी असावी असे त्याला वाटू लागले..



तर त्याने एक सुवर्ण हरिण वनात पाठवलं.

“ते किती सुंदर आहे,” सीता म्हणाली.

“मी त्याला तुझ्यासाठी पकडून आणेन,” राम म्हणाला. तो हरणाच्या मागे धावला आणि सीता मागे एकटी राहिली.

रावण आपलं दुष्टपणे हसला. त्याने सीतेला पकडलं आणि उचलून आपल्या जादूच्या रथात ठेवलं आणि आकाशात उडत निघाला.

“बिचारी सीता,” जया म्हणाली. “ती घाबरली होती का?”

“हो नक्कीच ती घाबरली होती,” जयाची आई म्हणाली. “पण ती निर्भय आणि चतुर होती.”

“का? तिने असं काय केलं?”

“रांगोळी काढता-काढता मी तुला सांगेन.”

जया आणि तिच्या आईने दाराच्या समोर मस्त रंगांनी रांगोळी काढली..

“देवांचे घरात स्वागत करण्यासाठी रांगोळी काढली जात असे,” आई म्हणाली.

“आणि वडिलांचे.”

जयाने रांगोळीत अजून थोडे रंग भरले. “हे खूप सुंदर आहे,” ती म्हणाली. “एका हारा सारखं”

“सीते जवळ एक हार होता,” आई म्हणाली, “तुला माहीत आहे तिने काय केलं ते?”

....सीता विचार करत होती की, रामाला कसं कळवायचं की ती कुठे आहे ते? मग तिच्या मनात विचार आला. जेव्हा रावणाचे एक तोंड तिच्याकडे नव्हतं तेव्हा तिनं आपला दागिना गळ्यातून काढला.एक–एक करून तिने त्यातले मणी रथाच्या खाली टाकले.

“कदाचित ते याच्या आधारे माझ्यापर्यंत पोहचतील,” तिने विचार केला..



सीतेला शोधण्यासाठी राम वनात धावू लागला. मग त्यांची भेट विशाल अशा हनुमानाशी झाली.

"हनुमान," राम मन्हाला, "तुम्ही सीता ला भगितला का?" "नाही, मी नाही बघितलं. पण आज आकाशातून हिऱ्यांचा पाउस पडत आहे!"

"ती तर सीतेची अंगठी आहे," आकाशाकडे बघत राम म्हणाला. "ती याच रस्त्याने गेली असणार."

"सीतेला शोधायला मी तुम्हांला मदत करेन," हनुमान म्हणाला.

“मला हनुमान चांगले वाटतात,” जया म्हणाली.

“ते रामाचे प्रिय मित्र होते,” तिची आई म्हणाली. “आपल्याला सगळ्यांना हनुमाना सारखं होण्याचा प्रयत्न करावा लागेल आणि आपण दुसऱ्यांना मदत करता याला हवी.”

“हनुमानाने काय केलं?”

....सीतेने पाडलेल्या दागिन्यांचा पाठलाग करत करत हनुमान आणि वानरांच्या सेने बरोबर राम समुदाच्या काठी पोहचले. समुद्राच्या पलीकडे खूप दूर लंका होती. जिथं रावणाचे राज्य होते. रामाने समुद्राकडे बघितलं.

"कोणीही मनुष्य समुद्र पार करू शकत नाही," ते म्हणाले. "हा खूप मोठा आहे. आता मी सीतेला कशा शोधू शकेन?"

"मी तिथं जाईन आणि सीतेला शोधून काढेन," हनुमानाने वचन दिले. त्याने समुद्रावरून उडी मारली. लवकरच त्याने सीतेला शोधून काढले, "चिंता करू नको," ते म्हणाले. "राम तुम्हांला मुक्त करण्यास येत आहेत."

“ओह, राम घाई करा,” जया म्हणाली.

“आपल्याला पण घाई करायला हवी,” तिची आई म्हणाली..

“नवीन वर्ष सुरु करण्यासाठी आपल्याला नवीन कपडे घालायला हवे. चल ये पटकन.”

“दिवाळीची वेळ आली का?” जयाने विचारलं.

“जवळ जवळ झालाच,” आई म्हणाली.

“पण अजून तर वडील आले नाही.”





जयाच्या आईने वर्षांकडे पाहिलं आणि एक दीर्घ श्वास घेतला, “आपल्याला प्रार्थना करायला हवी, ज्या ईश्वराने रामाची काळजी घेतली तशीच काळजी तो तुझ्या वडिलांची सुद्धा घेईन.”

....राम आता समुद्राकडे बघत होते. “मी समुदाच्या पलीकडे कसा जाऊ शकेन. ते विचार करत होते.”

तेव्हा वरुण देव समुद्रातून प्रकट झाले, “रावण खूप दुष्ट आहे,” वरुण देव म्हणाले, “मी तुम्हांला मदत करेन.” रामाने नमस्कार केला आणि विचारलं, “आपल्याला काय करावं लागेल?”

“वानरांना सांगा की पाण्यात दगड टाका.”

वानर समुद्रात दगड टाकू लागले. वरुण देव दगडांना पाण्यात बुडू देत नव्हते. दगड तरंगू लागले.

लवकरच समुद्रावर के मजबुत पूल तयार झाला. हे ऐकून रावणाला क्रोध आला.

“मग काय झालं? जयाने विचारलं. “त्यांच्यात युद्ध झालं?”

आईने मान हलवली, “एक भयंकर युद्ध झालं.”

“ओह, मला आशा आहे की राम जिंकले असतील,” जया म्हणाली.

......राम आणि वानर सेनाने कितीतरी दिवस रावण आणि त्याच्या असुरांबरोबर युद्ध केलं. असुर खूप भयंकर होते. मग रामाला रावण दिसला. त्यांनी सूर्याच्या प्रकाशाने आणि अग्नीने केलेला बाण रावणाला मारला.

बाण रावणाला लागला आणि तो जमिनीवर पडला.

युद्ध संपलं.



रामाने आणि सीतेने वानरांचे आभार मानले.
ते जादूच्या रथावर स्वार होवून अयोध्येला परत आले.

“तसेच वडील परत आले तर,” जया म्हणाली बाहेर जोरात वारं वहात होतं. आणि पाउसाचे थेंब खिडकीवर आदळत होते. “आता तर अंधार झाला आहे.”

“चला दिवे लावू या,” आई म्हणाली. “ते अंधाराला पळवून लावतील.”

जयाने काही दिवे उचलले. एक-एक करून तिने आईला दिवे दिले. ती त्यांना लावत होती. आणि खिडकीच्या चौकटीवर ठेवत होती.

जयाने दिव्यांच्या चमकणाऱ्या प्रकाशाकडे पाहिलं. “हे दिवे वडिलांना रस्ता शोधायला मदत करतील?” तिने विचारलं.

“मला पूर्ण आशा आहे,” आई म्हणाली. “अयोध्येच्या लोकांनी सुद्धा हेच केलं होतं.”

....राम आणि सीतेला घरचा रस्ता दाखवण्यासाठी लोकांनी दिवे लावले आणि मशाली पेटवल्या होत्या.

सगळ्यांनी जयजयकार केला. रावणाचा अंत झाला. वाईटावर चांगल्याचा विजय झाला.

शेवटी राम अयोध्येला परत आले.

“..... आणि बघ,” आई हसत म्हणाली, “अजून कोणी घरी परत आलं”

“बाबा!” जया प्रसन्नतेने ओरडली. “तुम्ही आलात!”

जयाचे वडील दिव्यांच्या प्रकाशाने लखलखणाऱ्या घरात आले. “गाडी खराब झाली होती.” ते म्हणाले. “मला वाटलं मी रात्रभर तिथेच फसेन, पण कोणीतरी थांबून मला मदत केली.”

“जशी हनुमानाए रामाला मदत केली होती,” जया म्हणाली.

“हो,” जयाचे वडील म्हणाले, “सगळ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा!”

हिंदू दीपावलीचा सण साजरा करतात. त्यादिवशी नवीन वर्षाची सुरुवात होते. लोक घर सजवतात आणि दिवे लावतात. आपल्या मित्रांना आणि नातेवाईकांना भेटवस्तू देतात. जयासारखं तुम्ही सुद्धा दिवे लावू शकतात.

मातीचे छोटे दिवे खिडकीच्त ठेवले जातात आणि देवाचा आशिर्वाद मिळावा म्हणून प्रार्थना केली जाते.

सामान: माती पाणी, रंग, ब्रश, मेणबत्ती.

आपल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी हिंदू लोक रांगोळीचे विवध रंगानी रंगवतात आणि तांदुळाच्या पिठीने सुद्धा रांगोळी काढतात.

मुठभर माती ओली करून भिजवा आणि त्याचा एक गोळा तयार करा.पाणी लावून ती ओलीच ठेवा.
अगठ्याने दाबून मातीच्या गोळ्याला एक टोक करा. टोक वर आणून वर एका चित्रात दाखवल्याप्रमाणे तयार करा.खालच्या भागाला दाबून समतोल करा. आपला दिवा वाळू द्या.

इथं दाखवल्याप्रमाणे रांगोळी काढा किंवा आपल्या मनाने काढा.
जेव्हा रंग वाळतील तेव्हा तुमचा दिवा तयार होईल.त्यात एक मेणबत्ती ठेवा आणि कोण्या मोठ्या माणसांच्या मदतीने ती पेटवा.

तुम्हांला वाटलं तर दिवा आतून बाहेरून दोन्ही बाजूने रंगवू शकतात.

मित्रांना आणि नातेवाईकांना पाठवण्यासाठी दीपावली कार्ड तयार करा..

सामान:
पातळ कार्डाचे एक शीट, कलर-पेन्सिल

कार्डला मधून घडी मारा.कार्डाच्या एका बाजूला आपला हात ठेवा आणि त्यानुसार कार्डावर रेषा आखा.हाताच्या चित्रामध्ये रंग भर आणि नमुने बनवा .
कार्डाच्या आता दिवाळीच्या शुभेच्छा असे लिहा.